# माणूस घडविणारे शिक्षण

विषयाची काहीशी उकल करणारे विवेचन

आजच्या समाजवर्तनाकडे जागरूकतेने पाहिले तर, त्याविषयी समाधान वाटावे, असे काही दिसत नाही. उलट, नजीकच्या भावी काळातील समाजस्वास्थ्याची चिंता वाटावी अशीच परिस्थिती सर्वत्र दिसते आहे. अशा परिस्थितीत जन्म घेणारी, शाळेत जाणारी, महाविद्यालयीन शिक्षण घेणारी, अशी 'आजची पिढी' त्यांच्या भावी जीवनासाठी कोणती सामग्री जवळ बाळगणार आहे, आणि त्यातून त्यांचे जगणे स्वास्थ्याचे, शांततेचे, संपन्नतेचे कसे होणार ? याविषयी गंभीरपणे विचार करण्यासाठी काही जबाबदार, जाणते विद्वान एकत्र येऊन विचार करताहेत, ही घटना, मला महत्त्वाची आणि भविष्याविषयीची आशा प्रज्वलीत करणारी अशी, वाटते आहे.

विचार करणे, सततच विचार करणे, आणि विचारांतून निघणारे निष्कर्ष घेऊन कृतिमय होणे, हीच एकमेव, समाजवर्तन बदलाकडे नेणारी दिशा आहे ! शिक्षण ही एक समाजवर्तन बदलाची प्रभावी व्यवस्था आहे असे मानून, आपल्या चर्चांमधून, शिक्षणातून नैतिकतेकडे नेणारी वाट आपण शोधतो आहोत, असे म्हणता येईल.

'नैतिकता' ही बहुचर्चित पण बऱ्याचदा अनेक पैलू असलेली अशी संज्ञा असल्यामुळे, सर्वांसाठी समान अर्थ मांडणारी अशी ती असत नाही. तरीही तिच्या अर्थाची निश्चितता करूनच आपण पुढे जायला हवे. व्यावहारिक पातळीवर नैतिकतेचा एक अर्थ 'माणुसकी' या शब्दाने व्यक्त करण्याची प्रथा आहे. माणसांनी माणसांशी माणुसकीच्या नात्याने वागावे, अशी अपेक्षा आपण करू शकतो.

आपल्या दैनंदिन व्यवहारात, प्रत्येक माणसाला, आर्थिक सामाजिक आणि व्यापक सांस्कृतिक अशा क्षेत्रांमध्ये वावरावे लागते. त्यामुळे, 'आर्थिक माणूस' की जो स्वतःचा आणि स्वतःच्या कुटुंबाचा, त्यातील व्यक्तींच्या उदरनिर्वाहाचा विचार करतो, हेच एक स्वतंत्र क्षेत्र ठरते आणि या क्षेत्रातील त्याची वागणूक नैतिकतेची असणे, ही नैतिकतेची पहिली पायरी मानता येईल. जरा वरच्या विस्तारित स्तरावर कुटुंबेतर अन्य व्यक्तींचा समाजगट डोळयासमोर आणला तर आपण या गटाचे सदस्य असतो. आणि आपल्या दैनदिन व्यवहारात, आपण एक 'सामाजिक माणूस' म्हणून वावरत असतो, हे लक्षात येईल. इथे आपली वागणूक माणुसकीची असणे, ही आपण मानत असलेली दुसरी नैतिकतेची पातळी होय. तिसरी नैतिकतेची विचारात घ्यावी अशी पातळी म्हणजे 'सांस्कृतिक माणूस' म्हणून असणाऱ्या आपल्या व्यवहारांची मानवेतर अन्य प्राणी, वनस्पती, सर्व निसर्ग, सृष्टी यांचा यात समावेश होतो. आपल्याकडून नीतिमत्तेची मागणी करणारे उच्चस्तरावरील हे एक क्षेत्र आहे. या तीनही पातळयांवर माणसाची निहित अशी काही कर्तव्ये मानता येतात. असा 'कर्तव्यनिष्ठ' माणूस हा सर्वार्थाने नैतिक माणूस म्हणून मानता येईल. अशी 'नैतिक माणसा'ची एक व्याख्या करता येईल.

येथे, आपल्या सांघिक विचारांतून, ‘असा माणूस घडणे’ याची जबाबदारी आपण ‘शिक्षणा’वर टाकत आहोत ! अशा या ‘शिक्षणा’विषयी जरा खोलवरचे विश्लेषण व्हायला हवे, असे मला वाटते.

वास्तविक पाहता, मानवी जीवनावर परिणाम करणारी अशी ‘शिक्षण’ ही एक अत्यंत गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. व्यवहारांत अनेक घटक, अनेक दिशांनी माणसाच्या ‘शिकण्या’वर परिणाम करीत असतात. या साऱ्या परिणामांची मोजमापे करणे मात्र केवळ अशक्यच असते.

**<u>शिक्षणाचे दोन प्रकार</u>**

आपण येथे, प्रामुख्याने, मुलांचे शिक्षण डोळयांसमोर आणू या ; आणि पुढील विवेचन त्यांच्याच संदर्भात करू या. शिक्षणाचे, मूलतः दोन प्रकार संभवतात. एक, आपोआप होणारे शिक्षण आणि दोन, मुद्दाम, ठरवून केले जाणारे शिक्षण.

माणसाचे किंवा मुलांचे आपोआप होणारे जे शिक्षण असते, त्याला शास्त्रामध्ये ‘सहज शिक्षण’ असे म्हणण्याचा प्रघात आहे. आपण ज्या वातावरणाचा भाग आहोत, त्या वातावरणात होत जाणारे असे हे शिक्षण असते. हे शिक्षण केले जात नाही तर ते आपोआप होत असते, त्यामुळे, साहजिकच, शिकणाऱ्या (मुलाचे) त्यावर फारसे नियंत्रण नसते. येथे शिकण्याची एक विशिष्ट अशी प्रक्रिया, मुलाच्या, मेंदूकडून घडून येत असते. मेंदू स्वैरपणे वातावरणातील ज्ञान, ज्ञानेंद्रियांकरवी शोषून घेत असतो. म्हणजे असे घडते की जे वातावरणात असते, ते आणि फक्त तेच शिकणारा शोषून घेत असतो. जर आपल्याला माणुसकीचे, नैतिकतेचे शिक्षण होण्याची अपेक्षा असेल तर तसे माणुसकीचे आणि नैतिकतेचे वातावरण सभोवतीच्या प्रांगणात असायला हवे.

मुद्दाम केले जाणारे शिक्षण हे त्यासाठी खास केलेल्या व्यवस्थांतून होत असते. त्याचे नियंत्रण अर्थातच ‘शिकणाऱ्या’ व्यक्तीच्या व्यतिरिक्त असणाऱ्या अन्य समाजगटांकडून, संस्थांकडून होत असते. ते व्यक्तीच्या नियंत्रणाबाहेरच असते. याप्रकारे केल्या जाणाऱ्या शिक्षणाला काही एक हेतू असतो; काही ठरविलेली उद्दिष्टे आणि त्यानुसार आखलेला शिक्षणक्रम असतो.

या दोन प्राथमिक शिक्षणप्रकारांच्या मार्गांनी होणाऱ्या शिक्षणाचा संबंध शरीरवैज्ञानिक दृष्टिकोणांतून मेंदूमध्ये घडणाऱ्या घटनांमध्ये असतो. त्यामुळे, मानवी मेंदूचा शिक्षणाशी असलेला संबंध विचारात घेणे उपयुक्त ठरेल. मेंदूबाबतची काही माहिती अशी आहे.

१. मेंदू हा माणसाचा शिकण्याचा अवयव आहे.
२. मेंदू हा शिकत शिकतच स्वतःला घडवत जातो.
३. मेंदू हा प्राप्त होणाऱ्या अनुभवांतून शिकतो. (आणि शिकता शिकता घडतही जातो.)
४. मुलांचा मेंदू, लहान वयात प्रौढांच्या अनुकरणांतून शिकतो.
५. मुलांच्या मेंदू आजूबाजूच्या वातावरणांतील अनुभव शोषून घेऊन शिकतो.

या वैशिष्ट्यांवरून लक्षात येईल की, मुले शिकतात, असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा त्यांचा मेंदूच शिकत असतो.

लहान मुलांच्या बाबतींत मेंदूबाबतचे एक अगदी वेगळे असे वैशिष्ट्य आपण लक्षात घेऊ या. हे वैशिष्ट्य म्हणजे, मुलांचे तर्कबुद्धी वापरून स्वतः विचार करायला लागण्याच्या आधीची एक पायरी असते, ती म्हणजे, 'स्वीकारण्या'ची पायरी. मुलांचा मेंदूही विचार करण्याच्या आधी कुणीतरी सांगितलेले 'स्वीकारायला' लागतो. याची अनेक उदाहरणे दोन्ही प्रकारच्या शिक्षणांतून आढळतात.

स्वीकारण्याच्या वयातील मेंदूची काही खास वैशिष्ट्ये सांगता येतील. मेंदू हा सामान्यतः आपले ७८ टक्के शिक्षण दृष्टीच्या संवेद्रांकरवी करीत असतो. नावीन्यपूर्ण, आकर्षक आणि त्वरित उपभोगाच्या गोष्टी लवकर शिकतो. या वयोवस्थेत, तार्किकतेपेक्षा, बुद्धिनिष्ठतेपेक्षा केवळ विश्वासार्हतेवर भर ठेवून शिकतो. विश्वासार्हता, अर्थातच, व्यक्ती प्रभावातून अथवा समूहप्रवाहांतून येते. तिला तार्किक विचारांचे भान असण्याची गरज नसते. या विश्वासार्हतेवर, मेंदूस्तरावर दीर्घकालचे स्वीकारले जाणारे जे व्यवहार असतात, त्यांना, प्रचलित भाषेत 'संस्कार' असे म्हणतात. हे संस्कार आधी व्यवहारांत येतात आणि मग, सवयीने अविकसित अथवा विकसनशील विचारांचा दृढ असा भाग बनतात. साहजिकच प्रौढपणी हे चिकट-चिवट संस्कार बदलणे दिवसेंदिवस कठीण होत जाते. मग त्याच्या योग्यायोग्यतेची, उपयुक्तता-अनुपयुक्तता यांची शहानिशा करण्याची शक्तीही क्षीण होत जाते.

मेंदूचा, एक लक्षात ठेवावा असा नियम आहे. मुलांच्या बाबतींत विचारांना वळण लागण्याच्या वयांतच, विचारांचे वळण बदलता येते; कारण, या वयातील मेंदू अधिक प्रमाणांत बदलशील असतो. आणि हे नेमके मुलांचे शालेय वय असते. संस्कारांची, सहज शिक्षणाची शहानिशा करण्याची सवयही याच वयात मुलांना लागायला हवी. या संदर्भात, शिक्षणाचा जो दुसरा, म्हणजे, मुद्दाम निर्माण केलेल्या व्यवस्थेतून दिले जाणारे शिक्षण हा प्रकार, विचारांचे वळण ठरविण्यासाठी, किंवा ठरविलेल्या दिशेने वळविण्यासाठी उपयोगांत आणता येतो. आधी म्हटल्याप्रमाणे शालेय वय हे प्रामुख्याने मेंदूचे 'स्वीकारण्याचे' वय असल्यामुळे या वयात स्थिर झालेल्या ज्ञानामुळे आपल्या आयुष्यात कायम टिकविण्याची शक्यता बऱ्याच प्रमाणात असते. मात्र यासाठी पूर्वतयारीच्या काही बाबी मांडता येतील ;

१. स्वतंत्रपणे विचार करण्याची सवय मुलांच्या अंगी बाणली जाणे,
२. या प्रक्रियेसाठी स्वतःची भाषा 'समाज-समृद्ध' होणे.
३. विचारांचे कृतीत रुपांतर करून शिकणे,
४. अशा (अपेक्षित) विचारांचे अनुभव मिळणे आणि
५. विचार वृत्तींत उतरवण्याचे उद्दिष्ट ठेवणे.

अर्थातच मुलांपुढे जाणून-बुजून ठेवले जाणारे विचार हे मुलांच्या भावीकालाच्या गरजांना अनुसरून, म्हणजे भाविकालाभिमुख असे असले पाहिजेत. त्याचबरोबर समाजापुढे स्व-हिताचे असे जे काही प्रगल्भ असे प्रारूप असेल त्याच्या आशयाशी हे विचार संलग्न असले पाहिजेत. भारतापुरते बोलायचे तर हे विचार लोकशाहीतील लिखित घटनेतून आलेले विचारच मूलतः आसवे लागतील; आणि जगाच्या हितासाठी युद्धांना मूठमाती देऊन, 'शत्रुबुद्धी विनाशाय' अशा प्रकारचे विश्वशांतीकडे प्रस्थान ठेवणारे असे असावे लागतील. अर्थातच हे, भाविकालाभिमुख विचार 'उद्यासाठीची मूल्ये' म्हणून मुलांना आत्मसात व्हावे लागतील.

आता आपण, माणूस घडण्याची कृतिशील व्याख्या करण्याच्या वळणाशी येऊन पोहचतो.

भाविकालाभिमुख, समाजहितकारक, शांततापूर्ण सहयोगी जीवनाच्या प्रारूपाला अनुसरून, वागण्याची वृत्ती प्राप्त होणे म्हणजे, (नैतिक) माणूस घडणे होय !

माणूस घडण्याची ही वाट आहे. आपल्याला हेही माहिती आहे की, ही वाट तीन हमरस्त्यांवरून जाते.

एक, परिसर, दोन, शाळा, आणि तीन, घर. आपली गरज अशी आहे की, या तिन्ही हमरस्त्यांना नैतिकतेचे, सुरुवातीला निदान कायदे पालनाचे वगैरे वातावरण असायला हवे. यासाठी अर्थातच आपल्याला पुढील तीन आव्हाने घ्यावी लागतील.

एक, आपल्यापुढचे पहिले आव्हान आहे, ते म्हणजे, मुलांभोवतालच्या परिसरातील नैतिकतेचे वातावरण निर्माण करण्याचे, टिकविण्याचे आणि वाढते ठेवण्याचे. त्यासाठी संघटित प्रयत्नांची कांस धरावी लागेल !

दोन, मुलांच्या स्वतंत्र नैतिक विचारशक्तीचा विकास आपल्या शाळांमधून आणि घरांमधून कसा घडवून आणायचा हे व्यवहारांतील दुसरे आव्हान आहे !

तीन, प्रचलित व सुधारित शालेय शिक्षणात, मुलांच्या आपणहून शिकण्याच्या क्षमतेचा वापर होऊन, सर्वच संकल्पनांचे ज्ञान – यात नैतिकतेच्या संकल्पनाही आल्याच – मुलांना हे कसे आत्मसात होईल; हे सार्वत्रिकरीत्या कसे घडेल असे पाहणे हे तिसरे आव्हान !

आपण किती ताकदीने ही आव्हाने पेलतो यांवरच सर्वस्वी माणूस घडणीची यशस्विता अवलंबून आहे !

❖